GR 200407271205240001

**वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा**
**अंध विद्यार्थ्यांना परीक्षेस अतिरिक्त वेळ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीजीई २००१/१३९७५/(१९०/२००१)/साशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांकः ३१ डिसेंबर २००१

वाचा:- १) वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा नियामावली

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांकः बीजीई १०९८/(७५/९४)/ माशि-८, दिनांक ३०.१०.१९९५

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांकः बीजीई २००१/१३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दिनांक १०.१०.२००१

४) संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांकःजीसीसी/२००१/क्र-१/परीक्षा/८२३०, दिनांक १३.१२.२००१

**शासन निर्णयः-** शासनाच्या वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षेस अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन गती ३० शब्द प्रति मिनिट परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी अनुमती उपरोक्त क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे. उपरोक्त क्र. १ च्या शासन निर्णयान्वये इतर अपंग विद्यार्थ्यांना देण्यात आलेली अतिरिक्त वेळेची सवलत अंध विद्यार्थ्यांना देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. अंध विद्यार्थ्यांना सनेत्र वाचकाने (मदतनीस) वाक्य शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग II साठी (गती उतारा) ७ मिनिटा ऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि.र.गंभीरे.

**(वि. र. गंभीर)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ, पुणे (१० प्रती)
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व जिल्हयाचे मुख्यकार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
समाज कल्याण विभाग, मंत्रालय
निवड नस्ती साशि-१